# गुरू पौर्णिमा

प्रत्येक शाळेला स्कूल leaving असते

त्यानंतर शिक्षक-विद्यार्थी नाते संपते।

जीवनात एक parallel युनिव्हर्सिटी असते

जी नकळत आपल्याला घडवते।

माझ्या जीवनात तुम्ही भेटत गेलात

काही वळणावर गुरू बनलात।

आणि मी बिनधास्त प्रवास करत राहिले

ह्या विद्यापीठाची जाणता अजाणता शिष्य झाले।

तुम्ही सर्वांनीच मला घडवल आणि मार्गदर्शन केलं

असे सर्वच तुम्ही हयात असाल अथवा जगात नसाल।

कळत किंवा नकळत संस्कार करतच आलात

माझ्यातल्या चांगल्यावाईटाचे मोजमाप करत गेलात।

या जीवनात मला जगायला, लढायला,

जिंकायला आणि हार मानायला,

अहंकार संपवायला, नम्र व्हायला

आदर करायला, तुम्हीच शिकवलत ।

धडपडत, ठेचकाळत, अथक प्रयत्नांनी

माझ्या परीने मी ते जमवलं।

सजीव, निर्जीव कुणीही असो

अश्या प्रत्येकाची मी ऋणी आहे... ।

असेच माझ्या पाठीशी, माझ्या बरोबर

किंवा माझ्या पुढ्यात उभे रहा...।

माझ्यासाठी प्रत्येक व्यक्ती

परिपूर्ण असेल किंवा नसेल।

गुण दोषांसकट गुरुस्थानीच आहे

अनुभवाने आता हे उमगले आहे।

एक नक्की एकलव्यासारखे,

आपल्यातले गुरू-शिष्य नाते अबाधित आहे।

अशा आपल्या सारख्या आबालवृद्ध व्यक्तींना माझा हृदयापासून सप्रेम नमस्कार

गुरू पोर्णिमेच्या हार्दिक शुभेच्छा !!

**- आशा अग्निहोत्री**